454

आहरण व संवितरण अधिकारी
घोषित करणेच्या संदर्भात सूचना

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांक टिआरडब्लू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ८ मार्च १९८४.

CR1984030801

# परिपत्रक

महालेखापाल-२ नागपूर यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, मंत्रालयीन विभागांच्या अंतर्गत अशा काही आस्थापनांना प्रशासकीय विभागांनी मंजूरी दिलेली आहे की ज्यांच्या मंजूरी आदेशामध्ये कोषागारांतून वेतन, भत्ते यांची रक्कम कोण काढणार आहे व ते काढणा-या आहरण व संवितरण अधिका-याचा हुद्दा काय आहे या गोष्टींचा विनिर्देश पूर्वक उल्लेख केलेला नसतो, त्याचप्रमाणे महाराष्ट्र कोषागारे नियम, १९६८ मधील नियम क्रमांक १५ [तीन] अन्वये लेखा परिक्षा कार्यालयाने कोणत्या अधिका-यांचे नावे प्राधिकार पत्र काढावे याचा उल्लेख नसतो. अशा प्रकरणात संबंधित विभाग/कार्यालय प्रमुख यांजकडून प्राधिकार पत्र निर्गमित करण्याबाबत वारंवार केल्या जाणा-या विनंत्या व संबंधितांना होणारे कष्ट टाळण्यासाठी तातडीची बाब म्हणून लेखा परिक्षा कार्यालय व वित्त विभाग यांना एखाद्या अधिका-यास कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करणे व त्याच्या नावे प्राधिकार पत्र काढणे भाग पडते आणि त्यानंतर या संबंधित प्रशासकीय विभागाकडे या संबंधात तसे आदेश काढण्याबाबत पुन्हा संदर्भ करावा लागतो.

२. उपरोक्त परिस्थिती टाळण्यासाठी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, जेव्हा नवीन कार्यालय उघडण्यात येते तेव्हा कार्यालय मंजूरीचे आदेशामध्येच त्या कार्यालयाच्या वतीने कोण अधिकारी आहरण व संवितरण अधिकारी राहील त्याच्या हुद्याचा न चुकता स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

म. गुं. खाबडे,
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग.

प्रत :

महालेखापाल [अकाउंटस् ॲन्ड एनटायटलमेंट] महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल [अकाउंटस् ॲन्ड एनटायटलमेंट] महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-२ [लेखा परिक्षा] महाराष्ट्र, नागपूर यांना त्यांच्या सचिव वित्त विभाग यांना लिहिलेल्या अर्धशासकीय पत्र क्रमांक टिएम/एयुटीएच/डिडिओएस/८००, दिनांक १६-११-८३ च्या संदर्भात.
महालेखापाल-१ [लेखा परिक्षा] महाराष्ट्र, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभाग प्रमुख,
सर्व कार्यालय प्रमुख,
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, एडीएम-९.

[कृ.मा.प.]

शाममु. रोटा/वि.वि./एच-२[९०००+७-४-८४]

मूळ ७ (कृपया मागे पहा)

प्रत पुणे क.

Declaration of Drawing and Disbursing Officers - Instructions regarding .....

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Circular No. TRW-1083/CR-611/83/ADM-9,
Mantralaya, Bombay-400 032, Dated 8th March 1984.

## CIRCULAR

It has been brought to the notice of Government by the Accountant General-II, Nagpur that some of the Establishments under the Mantralaya Departments have been created for which Government sanctions have been issued by the Administrative Departments, without specifically mentioning in those orders the designation of the Drawing and Disbursing Officer who will draw the pay and allowances from the treasury and in whose favour the Audit Office has to issue authority on the treasury as required under rule 15(3) of the Maharashtra Treasury Rules, 1968. In such cases, in view of the pressing requests from the Heads of the Offices etc. for issue of authorisation on the treasury declaring the particular Head of the Office as Drawing and Disbursing Officer, Finance Department as well as the Accountant General is compelled to issue the authorities in order to avoid hardships to Government servants concerned and then make a back references to the Administrative Departments for issue of orders declaring the particular head of the office as Drawing and Disbursing Officer.

2. In order to avoid such a situation all the Administrative Departments in Mantralaya are hereby instructed that whenever a new office is sanctioned, in the order of sanction itself, the designation of the officer who will be the Drawing and Disbursing Officer in respect of such new office should be invariably specified.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M.G. KHABADE,
Desk Officer,
Finance Department.

To

The Accountant General(Accounts and Entitlement), Maharashtra, Bombay,

Branch Office of the Accountant General(Accounts and Entitlement), Maharashtra, Nagpur,

The Accountant General-II(Audit), Maharashtra, Nagpur (with reference to his Demi-Official letter No.TM/Auth-DDOS/800, dated 16th November 1983, addressed to Secretary, Finance Department),

The Accountant General-I(Audit), Maharashtra, Bombay,

All Departments of Mantralaya,

All Heads of Departments,

All Heads of Offices,

All Desks in Finance Department,

The Select file, ADM-9.

---

H-2(9,000+7-4-84)-a.